# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दि. १६/१०/२००६ रोजीच्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त

**सोमवार** दिनांक **१६ ऑक्टोबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ०३.०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस प्र.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. पांडे विनायक प्रभाकर
5. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
6. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
7. श्री. सावंत मधुकर दामोधर
8. श्री. मो. जावेद मो. इसाक

**संवाद :**

श्री. मधुकर सावंत : सन २००० च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या वार्ड क्र ४६ च्या स.सदस्या पै. श्रीमती आबेदा बेगम यांचे आज अल्पशा आजराने दु:खद निधन झालेले आहे त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. रविकांत गवळी : यास माझे अनुमोदन आहे. त्यांचे दु:खद निधनामुळे आजची सभा तहकूब करावी.

डॉ. आशा बिनवडे : स.सदस्य श्री. रविकांत गवळी तसेच स. श्री मधुकर सांवत यांनी जी सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे. स. सदस्या श्रीमती आबेदा बेगम यांचे आज अल्पशा आजराने निधन झालेले असून त्या एक महिला सदस्या होत्या. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.त्यानंतर आजची सभा तहकूब करावी.

सौ. लता दलाल : श्रीमती आबेदा बेगम यांचे आज सकाळी दु:खद निधन झाले एक महिला सदस्या व आमच्या सहकारी होत्या यांचे दु:ख होत आहे. या सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. त्यांचे निधनामुळे आजची सभा तहकूब करावी, त्यांचे नातेवाईकांना शोक संदेश पाठविण्यात यावा.अशी विनंती आहे.

श्री.मो.जवेद मो.इसाक : वार्ड क्र ४६ च्या स. सदस्या श्रीमती आबेदा बेगम यांचे आज सकाळी दु:खद निधन झालेले आहे. त्यांना ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करून आजची सभा तहकूब करण्यात यावी.

मा. सभापती : स. सदस्या श्रीमती आबेदा बेगम यांचे दु:खद निधनामळे सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच स. सदस्य या सर्वांनाच दु:ख झालेले आहे. सर्व सदस्यांचे मत लक्षात घेता त्यांना या सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात येते सर्वांनी उभे रहावे.व श्रध्दाजंली अर्पण केल्या बाबतचा शोक संदेश त्यांचे नातेवाईकांना पाठविण्यात यावा.

(याच वेळी स. सदस्या पै. श्रीमती.आबेदा बेगम यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. )

स. सदस्या श्रीमती आबेदा बेगम यांचे दु:खद निधनामुळे आजची सभा तहकूब करण्यात येते व ही सभा येत्या १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता घेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (13)**

**दिनांक :- 16/10/2006**

## सू च ना

सोमवार दिनांक 16/10/2006 रोजी तहकुब करण्यात आलेली **स्थायी समितीची सभा आता गुरूवार दिनांक 19 ऑक्टोबर 2006 रोजी सकाळी 11.00 वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेची विषयपत्रिका यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. करीता या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद